असा. क्र. ३६

२५७

एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**सोमवार, ऑक्टोबर १, २००७/आश्विन ९, शके १९२९**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७.**— फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम .. .. | २६९-२७० |

दिनांक १९ सप्टेंबर २००७ रोजी मा. राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

**सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७.**

(मा. राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १ ऑक्टोबर २००७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम**

१९७४ चा २. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, महाराष्ट्र राज्यास लागू करताना, त्यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या अठ्ठावन्नाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २००७ असे म्हणावे.





[किंमत : रुपये ९.००]

(२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २९ ची सुधारणा.

२. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, महाराष्ट्र राज्यास लागू करताना, त्याच्या कलम २९ मध्ये,— १९७४ चा २.

(क) पोट-कलम (२) मध्ये, " जास्तीत जास्त दहा हजार रुपये " या मजकुराऐवजी " जास्तीत जास्त पन्नास हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (३) मध्ये, " जास्तीत जास्त पाच हजार रुपये " या मजकुराऐवजी " जास्तीत जास्त दहा हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ३८ व/एमआर/साऊथ-२२१/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**गुरुवार, नोव्हेंबर ८, २००७/कार्तिक १७, शके १९२९**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

# भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८.**–अन्न भेसळ प्रतिबंध अधिनियम, १९५४ महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. | २८२-२८३ |

दिनांक २८ ऑक्टोबर २००७ रोजी मा. राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

## सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८.

(मा. राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ८ नोव्हेंबर २००७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

## अन्न भेसळ प्रतिबंध अधिनियम, १९५४ महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

१९५४ चा ३७. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, अन्न भेसळ प्रतिबंध अधिनियम, १९५४ हा, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्तावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, अन्न भेसळ प्रतिबंध (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २००६ असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.



**[किंमत : रुपये ९.००]**

सन १९५४ चा अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम २० ऐवजी नवीन कलम दाखल करणे.

२. अन्न भेसळ प्रतिबंध अधिनियम, १९५४ हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्याच्या कलम २० ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येईल :— १९५४ चा ३७.

अपराधांची दखल घेणे आणि वॉरंटशिवाय अटक करणे.

" **२०.** (१) या अधिनियमाखालील शिक्षापात्र असलेले सर्व अपराध दखलपात्र आणि अजामिनपात्र असतील.

(२) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील असा, पोलीस निरीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला कोणताही पोलीस अधिकारी, जिच्याविरुद्ध ती, या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या अपराधांपैकी कोणत्याही अपराधाशी संबंधित आहे, अशी संयुक्तिक तक्रार करण्यात आलेली असेल किंवा विश्वसनीय माहिती मिळालेली असेल, अशा कोणत्याही व्यक्तीस वॉरंटशिवाय अटक करू शकेल. ".

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई